<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांच्यामार्फत शपथेवर सुरु–</u>

०३.	मी दि.२७/११/२०१७ रोजी वेंगुर्ला येथे महसूल नायब तहसिलदार म्हणून कार्यरत झाले होते. (साक्षीदाराला निशाणी ११ वरील आदेश दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ११ कडील आदेशामध्ये आरोपी यांच्या नावाचा उल्लेख करुन त्यांच्या बांधकामासंदर्भात तक्रार दाखल करण्याबाबत स्पष्टपणे आदेश देण्यात आलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ११ कडील आदेशाला कोणतेही परिशिष्ट जोडण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यापुर्वी कोणतीही खातेनिहाय चौकशी करण्यात आली नव्हती. प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यापुर्वी तलाठी व मंडळ अधिकारी यांनी गुन्ह्याच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्राथमिक चौकशीमध्ये आरोपीचा जबाब नोंदविण्यात आलेला नाही. प्राथमिक चौकशीदरम्यान आरोपीस नोटिस देण्यात आली होती किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे पर्यावरण संरक्षण कायदा कलम ५ व सी.आर.झेड.अधिसूचनेनुसार तक्रार दाखल करण्याबाबत मला प्राधिकृत करण्यात आले होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे सी.आर.झेड.अधिसूचनेचा भंग झाला म्हणून पर्यावरण संरक्षण कायद्याचा देखील भंग झाला अशी माझी धारणा होती. मी स्वत: घटनास्थळी भेट देवून वस्तुस्थितीची पाहणी केली नव्हती. मी प्राथमिक चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून वस्तुस्थितीबाबत लेखी माहिती घेतलेली नव्हती. मी प्रस्तुत गुन्ह्याकामी कोणकोणत्या कायद्यांचा भंग झाला यासंदर्भाने सरकारी वकील अथवा अन्य कोणत्याही कायदेतज्ज्ञांचा लेखी अभिप्राय घेतलेला नव्हता. मी प्रस्तुत गुन्ह्याकामी जिल्हा नगररचनाकार यांचा लेखी अभिप्राय घेतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र शासनामार्फत सी.आर.झेड.अधिसूचनेनुसार स्वतंत्र प्राधिकरणाची नेमणूक करण्यात आलेली आहे. मी प्रस्तुत गुन्ह्याकामी सी.आर.झेड.अधिसूचनेनुसार नेमणूक करण्यात आलेल्या प्राधिकरणातील संबंधीत अधिकारी यांचा अभिप्राय घेतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मला जमीन मोजणीबाबतची माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या बांधकामाचे स्थान, सर्व्हे क्रमांक अथवा हिस्सा क्रमांक निश्चित करण्याकरीता त्याठिकाणी असलेल्या जमिनीची मोजणी करणे आवश्यक आहे. हे म्हणणे

खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील बांधकामाचे निश्चित स्थान मिळविण्याकरीता मी उपअधीक्षक भूमी अभिलेख वेंगुर्ला यांच्या कार्यालयाची मदत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी बांधकाम निश्चित कोणत्या ठिकाणी करण्यात आले आहे या संदर्भाने कोणतेही लेखी मार्गदर्शन माझ्या वरिष्ठांकडून घेतलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला आमच्या कार्यालयाने प्राधिकृत केल्यामुळे मी प्रस्तुतकामी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: बांधकामाच्या वैधते अथवा अवैधतेविषयी कोणतीही खातरजमा केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रस्तुतकामातील बांधकामाविषयी पुर्ण माहिती नसतानादेखील केवळ कार्यालयीन आदेशाचे पालन करण्याकरीता मी तक्रार दाखल केली आहे.

मध्यांतराची वेळ झाल्याने उलटतपास मध्यांतरापर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/-
दिनांक- १५/१०/२०२५ (एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

**<u>मध्यांतरानंतर उर्वरित उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांच्यामार्फत शपथेवर सुरु-</u>**

०४. मी प्रस्तुत तक्रार दाखल करण्यापुर्वी सी.आर.झेड.अधिसूचना पाहिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी सी.आर.झेड. झोनमध्ये कोणकोणत्या जमिनी येतात याचा अधिकृत नकाशा प्रस्तुत तक्रार दाखल करण्यापुर्वी पाहिलेला नव्हता. तक्रार दाखल करतेवेळी सी.आर.झेड. झोनमध्ये कोणकोणत्या जमिनी येतात हे दर्शविणारा अधिकृत नकाशा आमच्या कार्यालयात उपलब्ध होता किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सी.आर.झेड.झोनमध्ये कोणकोणत्या जमिनी येतात हे दर्शविणारा अधिकृत नकाशा माझ्या वरिष्ठांकडून मागविलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुतकामी सर्व्हे क्र.२ हिस्सा क्र. १/१ब ही जमीन व वादग्रस्त बांधकाम हे सी.आर.झेड.झोनमध्ये येते हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुतकामी दाखल केलेला नाही.

०५.　　हे म्हणणे खरे आहे की माझ्या फिर्यादीमध्ये वादग्रस्त जमीन ज्या गावामध्ये आहे त्या गावाचे नाव सिध्दार्थवाडी असे नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्राथमिक चौकशीच्या अहवालामध्ये वादविषयक जमिनीचे गाव सागरतीर्थ असल्याचा उल्लेख फिर्यादीमध्ये नमूद आहे. वेंगुर्ला या तालुक्यामध्ये सिध्दार्थवाडी व सागरतीर्थ ही दोन वेगवेगळी गावे आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की सिध्दार्थवाडी हे गाव उभादांडा या सझा मध्ये येते. सागरतीर्थ हे गाव पुर्वीचे आरवली व आजरोजी सागरतीर्थ या सझा मध्ये येते किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाव मौजे सिध्दार्थवाडी येथील सर्व्हे क्र.२ हिस्सा क्र. १/१ब या जमिनीशी आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाव मौजे सिध्दार्थवाडी येथील सर्व्हे क्र.२ हिस्सा क्र. १/१ब या जमिनीसंदर्भात आमच्या कार्यालयास कोणताही अहवाल प्राप्त झाला नव्हता. सिध्दार्थवाडी व सागरतीर्थ ही दोन्ही स्वतंत्र गावे एकमेकांपासून दहा किलोमीटर अंतरावरती आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की वादग्रस्त बांधकाम अवैध आहे हे आजतागायत कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने जाहीर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी उपविभागीय अधिकारी सावंतवाडी, ग्रामपंचायत उभादांडा व एम.सी.झेड.एम.ए. या विभागांकडे पत्राद्वारे वादग्रस्त बांधकामासंदर्भाने परवानगी घेतली होती किंवा कसे याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीवर आमच्या कार्यालयामार्फत काढण्यात आलेली नोटीस बजावणीबाबतचा पुरावा प्रस्तुतकामी दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की आमच्या कार्यालयामार्फत काढण्यात आलेली नोटीस आरोपीस प्राप्त झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की माझे फिर्यादीतील कथन हे कोणत्याही पुराव्याशिवाय केलेले कथन आहे.

०६.　　हे म्हणणे खरे आहे की, सी.आर.झेड.अधिसूचनेच्या अनुषंगाने कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यासंदर्भात कारवाई करण्याचे सर्व अधिकार हे एम.सी.झेड.एम.ए. या विभागांकडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पर्यावरण संरक्षण कायद्यातील तरतूदींचा भंग झाल्यास त्याअनुषंगाने कारवाई करण्याकरीता स्वतंत्र प्राधिकरण नेमण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सी.आर.झेड. अधिसूचना व पर्यावरण संरक्षण कायद्यामधील तरतूदींचे

उल्लंघन झाल्यास त्या अनुषंगाने कारवाई करण्याचे अधिकार महसूल खात्यास नाही. हे म्हणणे खरे आहे की अधिकार नसताना प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या हिताच्या विरोधात दिलेली साक्ष खोटी आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/-

दिनांक- १५/१०/२०२५

(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.